0 9 AUG 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरणातील आव्हाने स्वीकारण्यासाठी सकारात्मक दृष्टी हवी

## डॉ. डी. टी. शिर्के : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना ३५ व्या स्मृतिदिनी अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील आव्हानांना स्वीकारण्यासाठी सकारात्मक दृष्टीची आवश्यकता आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवताना शिक्षक सजग असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३५ व्या स्मृतिदिनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'भविष्यातील शिक्षण : संधी आणि आव्हाने' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



**कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३५ व्या स्मृतिदिनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी सुमारे पाच दशकांपूर्वी उभ्या केलेल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानामध्ये नव्या शैक्षणिक धोरणाची बीजे रोवली गेली आहेत. त्यामुळेच श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुसंस्कारी नागरिक घडवण्याचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संघर्षातून बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षण यज्ञात बापूजींनी ६९ वर्षे अव्याहतपणे कार्य केले. या स्मृतिदिनानिमित्ताने आजच्या शिक्षकांनी बापूजींच्या विचार व कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थी घडवावेत व संस्थेचा नावलौकिक वाढवावा.

याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, प्रतिमा पूजन, संस्था प्रार्थना व महेश हिरेमठ आणि सहकाऱ्यांच्या गायनाने झाली. प्रास्ताविक संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी केले. आभार संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मानले. सूत्रसंचालन प्र. प्राचार्य डॉ. महेश गायकवाड आणि प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, श्रीराम साळुंखे, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व संस्थेच्या १३ जिल्ह्यांतील ४०७ शाखांतील गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. दुपारच्या सत्रात मुख्याध्यापकांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

पुढारी



# कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी पदभार स्वीकारला

कोल्हापूर : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी नुकतीच प्रा. डॉ. कामत यांची नियुक्ती जाहीर केली होती. डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू तथा एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांच्याकडून कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली. याप्रसंगी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. जयराम खोब्रागडे, एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत हेळवी, शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. परळीकर, डॉ. श्रीनिवास कुलकर्णी आदी उपस्थित होते. डॉ. कामत हे कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता तसेच इलेक्ट्रॉनिक्स विभागात वरिष्ठ प्राध्यापक होते. त्यांची डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरू पदावर पाच वर्षे कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे.

तरूण भारत



मुंबई : येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार डॉ. आर. के. कामत यांच्याकडे सुपुर्द करताना एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव. सोबत डॉ. जयराम खोब्रागडे, प्राचार्य डॉ. वसंत हेळवी.

# डॉ. कामत यांनी स्वीकारला कुलगुरू पदाचा कार्यभार

**कोल्हापूर :** मुंबई येथील डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा कार्यभार डॉ. आर. के. कामत यांनी स्वीकारला. एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांनी कुलगुरू पदाची सुत्रे डॉ. कामत यांच्याकडे प्रदान केली. तसेच पुष्पगुच्छ देवून स्वागतही केले.

डॉ. कामत यांनी विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्वोत्परी प्रयत्न करु अशी ग्वाही कुलगुरू पदाची सुत्रे स्वीकारल्यानंतर दिली. तसेच भविष्यातील नवसंकल्पनांची माहिती देखील उपस्थितांना दिली. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा संचालक डॉ. जयराम खोब्रागडे, मानविकी विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत हेळवी, आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता तथा शासकीय अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. परळीकर, डॉ. श्रीनिवास कुलकर्णी, नवसंशोधक, विभागप्रमुख आदी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठ ऑफलाईन परीक्षेला २४ हजार ६६४ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातंर्गत विद्यापीठस्तरावरील परीक्षेतंर्गत सोमवारी ३१ विषयाच्या परीक्षा झाल्या. २४ हजार ६६४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

बीए., बीएस्सी. (फूड अँड टेक्नॉलॉजी, बायो-टेक, आयटी, कॉप्म्युटर सायन्स, शुगर टेक), बीएस्सी. (आयटी, इन्व्हायरमेंट सायन्स, कॉम्प्युटर सायन्स), बी. कॉम. (आयटी), एम.कॉम. (रियल इस्टेट अँड व्हॅल्युएशन), एलएलबी, बी.टेक., बी.कॉम., बीए., बीसीए, बीबीए, बी. आर्किटेक्चर, बीए, बीएड., बी. व्होक., एमएसडब्ल्यू., बीएसडब्ल्यू., एम. ए. (मास कम्युनिकेशन), बी.लिब.,एम.लिब., बीजे. एमजे. अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.